# <u>जाहीर प्रकटन</u>

**<u>संदर्भ</u>**:- १. The Gazzette of India, Extraordinary, Part-II-Section-3-Subsection (ii), Ministry of Environment, Forest & Climate Change, Notification, New Delhi, 8th April 2016

२. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, अनुसुची "ड' प्रकरण-१४, स्वच्छता विषयक तरतुदी

३. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक स्वमअ-२०१७/प्र.क्र.१२६/नवि-१४ मुंबई. दिनांक ११ जुलै २०१९ अन्वये प्रसिध्द उपविधी

उपरोक्त संदर्भ क्र.०१ अन्वये प्रकाशित **Solid Waste Management Rules 2016** अन्वये नमूद ४ (१) ( a) नूसार Every generator shall

Segregate and store the waste generated by them in three separate streams namely bio-degradable, non-biodegradable and domestic hazardous waste in suitable bins and handover segregated waste to authorized waste pickers or waste collector as per the direction or notification by the local authorities from time to time.

सबब, सदरहू जाहिर प्रकटनाद्वारे नाशिक महानगरपालिका हद्दीतील सर्व कचरा उत्पादकांना व नागरीकांना सुचित करणेत येते कि, आपल्या ठिकाणी निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याचे जागीच ओला (Wet Waste) व सुका (Dry Waste) व घरगुती धोकादायक (Domestic Hazardous Waste) असे तीन प्रकारात वर्गीकरण करणेत यावे.

१. ओला कचरा (Wet Waste) म्हणजे स्वंयपाक घरात निर्माण होणारा घनकचरा जसे कि, भाजीपाला, चहा पावडर, अंडयाचे टरफल, केळीचे व फळांचे साल इत्यादी.

२. सुका कचरा (Dry Waste) म्हणजे, पुर्नवापर करता येऊ शकणारा कचरा जसे कि, वृत्तपत्रे, कागद, पुष्ठा, दुधाची पिशवी इत्यादी

३. घरगुती धोकादायक (Domestic Hazardous Waste) म्हणजे, नष्ट केलेले रंगाचे डब्बे, किटकनाशक डब्बे, सी एफ एल बल्ब, टयुबलाईट, मुदतबाहय औषधे, तुटलेली थर्मामीटर, घरगुती वापर झालेल्या बॅटरी, संसर्गीत कापूस बोळे, घरगुती वापरलेल्या सुया इत्यादी.

तरी, सर्व कचरा उत्पादकांनी व नागरीकांनी वरीलप्रमाणे जागीच कचऱ्याचे वर्गीकरण (**Source Segregation**) करावे.

नाशिक महानगरपालिकेने कचराकुंडी मुक्त शहर (Binless City) धोरण अवलंबविले असून घरोघरी कचरा संकलन करणेकामी घंटागाडी सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. मिश्र स्वरूपात घंटागाडी कचरा स्विकारला जाणार नाही तसेच ओला कचरा (हिरवी कचरादाणी) व सुका कचरा (निळी कचरादाणी) तसेच घरगुती धोकेदायक कचरा (पिवळी कचरादाणी) स्वतंत्रपणे घंटागाडीमध्ये संकलित केला जाईल याची नोंद सर्व नागरीक व व्यावसायिकांनी घ्यावी व दंडात्मक कारवाई टाळावी.

**राधाकृष्ण गमे (भा.प्र.से)**
**आयुक्त**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**नाशिक महानगरपालिका,नाशिक**

**घनकचरा व्यवस्थापन विभाग**

---

**<u>जाहीर प्रकटन</u>**

**<u>संदर्भ</u>**:- १. Ministry of Environment, Forest & Climate Change, Notification, New Delhi 8th April 2016

२. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक स्वमअ-२०१७/प्र.क्र.१२६/नवि-१४ मुंबई. दिनांक ११ जुलै २०१९ अन्वये प्रसिध्द उपविधी

उपरोक्त संदर्भियान्वये **Solid Waste Management Rules 2016** अन्वये प्रकाशित करण्यात आलेले असून यामध्ये मुद्दा क्रमांक ०४ Duties of Waste generators अंतर्गत नमूद केलेनूसार

कलम ४ (६) अन्वये All Resident Welfare Associaction & Market Shall Ensure that the Bio-degradable Waste shall be processed, treated & disposed off through composting or bio methanation within the primises.

कलम ४ (७) अन्वये All Gated Communities & Institutions with more than ५००० Sq.Mt area shall insurance that the Bio-degradable Waste shall be processed, treated & disposed off through composting or bio methanation within the primises.

कलम ४ (८) अन्वये All Hotels & Restaurantes shall insurance that the Bio-degradable Waste shall be processed, treated & disposed off through composting or bio methanation within the primises.

सबब, उपरोक्त तरतूदी अन्वये नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व सोसायटी, अपार्टमेंट, व्यापारी संस्था, हॉटेल व्यावसायिक यांना सुचित करण्यात येते कि, आपल्या ठिकाणी निर्माण होणाऱ्या ओल्या कचऱ्यावर जागीच प्रक्रिया करण्याकरीता व्यवस्था कार्यान्वीत करावी व सुका कचरा महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करावा.

उपरोक्त प्रमाणे जे नागरीक, व्यावसायिक, संस्था अवलंब करतात त्यांनी महानगरपालिकेस अवगत करावे व जे नागरीक अंमलबजावणी करणार नाहीत त्यांच्यावर शासन निर्णयानूसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**(राधाकृष्ण गमे, भा.प्र.से)**
**आयुक्त**
**नाशिक महानगरपालिका,नाशिक.**